सोमवार दि. २० जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## शेतकरी, गरीब आणि जनतेच्या हक्कांसाठी संघर्षाची तयारी ठेवा; खा. डॉ. कल्याण काळे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

### वाढदिवसानिमित्त महाविकास आघाडीचा अभिष्टचिंतन सोहळा; हे सरकार विरोधकांना शत्रू मानते, २०२९ मध्ये परिवर्तनाचा विश्वास


**जालना । प्रतिनिधी**

''सत्ता विरोधकांना निधीपासून वंचित ठेवू शकते, पण जनतेचा विश्वास कधीही रोखू शकत नाही. शेतकरी, गरीब, बेरोजगार युवक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आता संघर्षाशिवाय पर्याय उरलेला नाही. आगामी काळात रस्त्यावर उतरून आंदोलने, मोर्चे आणि जनआंदोलन उभारण्याची तयारी ठेवा,'' असे स्पष्ट आवाहन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी कार्यकर्त्यांना केले.



खा. डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी जालना शहरातील मातोश्री मंगल कार्यालयात महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाला काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

व्यासपीठावर माजी आमदार राजेश राठोड, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, संजय मुथा, सुभाष कोळकर, डॉ. विशाल धानुरे, *(पान २ वर)*




जालना येथील प्रति पंढरपूर समजला जाणारी आनंदी स्वामी महाराज मंदिरात आजचे पहिले रूप मल्लाराचे असून भक्तगण दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येत असून येळकोट येळकोट जय मल्हार ही घोषणा करत आहे. ***छायाचित्र किरण खानापुरे***

## जिल्हा नियोजन समितीची बैठक गाजली; आ. बबनराव लोणीकरांनी समृद्धी महामार्गावरील कथित मुरुम चोरीचा मुद्दा लावून धरला

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विकासकामे, निधी वाटप आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर जोरदार चर्चा झाली. या बैठकीत माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी समृद्धी महामार्गाच्या कामातील कथित अनियमितता, प्रशासनाची भूमिका आणि विकासकामांतील विलंब याबाबत अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना लोणीकर



यांनी स्पष्ट केले की, पालकमंत्र्यांशी कोणताही वाद झालेला नाही. भाजप, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या सर्व पक्षांचे आमदार विविध विकासकामे, निधी आणि प्रलंबित तक्रारींबाबत चर्चा करण्यासाठी पालकमंत्र्यांची भेट घेण्यासाठी एकत्र आले होते. यावेळी लोणीकर यांनी समृद्धी महामार्गाच्या कामात १० लाख ब्रासपेक्षा अधिक मुरूमाचे बेकायदेशीर उत्खनन झाल्याचा आरोप केला. संबंधित कामासाठी केवळ सुमारे ७८ हजार ब्रास मुरूमाची रॉयल्टी भरल्याचा दावा करत प्रत्यक्ष उत्खननाची अधिकृत मोजणी करण्याची मागणी त्यांनी पुन्हा केली. वाडूर परिसरात आवश्यक परवानग्या व प्रदूषण नियंत्रण मंडळाची ना हरकत () नसतानाही खडी क्रेशर सुरू असल्याचा मुद्दाही त्यांनी बैठकीत *(पान २ वर)*

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### मतदार यादी पूर्ननिरीक्षण शिबिरात शेकडो नागरिकांचा सहभाग; सभापती अशोक पांगारकर मित्रमंडळाच्या स्तुत्य उपक्रम

**जालना - प्रतिनीधी**

राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज रविवारी मुक्तेश्वर लॉन्स येथे रक्तदान शिबिर आयोजित करून वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला जोडून आयोजित करण्यात आलेल्या मतदार यादी पुर्ननिरीक्षण शिबिराला देखील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती जालना मनपाचे स्थायी समिती सभापती तथा



कार्यक्रमाचे मुख्य संयोजक अशोक पांगारकर यांनी दिली.

जुना जालना भागातील मुक्तेश्वर लॉन्स येथे आज रविवारी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण कार्यक्रमासह शहरातील प्रभाग क्र.११,१३ व १४ मधील सर्व मतदारांसाठी मतदार यादी पुनर्निरीक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल, मनपाचे स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, गटनेता महेश निकम, नगरसेवक शशिकांत घुगे, शिक्षण सभापती भाग्यश्री जोगस, स्वच्छ्ता व आरोग्य उपसभापती सौ. अनामिका पांगारकर, महिला व बालकल्याण *(पान २ वर)*

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात २१ जुलैला जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा

### *५९ जातींचा सहभाग, लाखोंचा जनसागर उसळणार - आयोजक*

**जालना - प्रतिनिधी**

अनुसूचित जातींमधील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाच्या विरोधात जालना जिल्ह्यातील आंबेडकरी समाज आणि अनुसूचित जातीतील ५९ जातींच्या संयुक्त वतीने मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढण्यात येणार असून, या मोर्चात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती आज हॉटेल मधुबन येथे आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेस ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, ॲड. शिवाजीराव आदमाने, डॉ. सुशील सूर्यवंशी, संदीप खरात, महेंद्र रत्नपारखे, हरिश रत्नपारखे, प्रभाकर घेवंदे, ॲड. दशरथ इंगळे, सिद्धार्थ चव्हाण, दिनेश आदमाने, दादाराव लहाने, राहुल रत्नपारखे, अरुण वाघमारे, राजेश सदावर्ते, रवी मस्के, भैयासाहेब बोबडे, राष्ट्रपाल जाधव, मधुकर बोबडे, रितेश चौधरी यांची उपस्थिती होती.

दरम्यान पत्रकार परिषदेत आयोजकांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत सांगितले की, अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय



हा सामाजिक न्याय, समता आणि भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांवर घाला घालणारा आहे. या निर्णयामुळे समाजात कृत्रिम भेद निर्माण होत असून, अनेक दशकांच्या सामाजिक ऐक्याला तडा जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

आयोजकांनी आरोप केला की, ''फोडा आणि राज्य करा'' या वसाहतवादी धोरणाची पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र दिसत आहे. समाजात जातीजातीत अविश्वास आणि वैमनस्य निर्माण करणाऱ्या निर्णयांमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येत असून, सर्वसामान्य जनता त्याची किंमत मोजत आहे, असा दावा त्यांनी केला.

सरकारने सामाजिक प्रश्न सोडविण्याऐवजी समाजात विभागणी निर्माण करणारी भूमिका घेतल्याचा आरोप करत आयोजकांनी सांगितले की, उप वर्गीकरणाचा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा. अन्यथा राज्यभर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

आयोजकांच्या मते, जालना जिल्ह्यातील ५९ अनुसूचित जाती या मोर्चात एकत्रित सहभागी *(पान २ वर)*

## अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वपक्षीय समितीतर्फे अभिवादन

**जालना -प्रतिनिधी**

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वपक्षीय जयंती उत्सव समिती, जालना यांच्या वतीने त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना विधानसभा मतदारसंघाचे लाडके आमदार श्री. अर्जुनभाऊ खोतकर हे होते. समितीचे अध्यक्ष किरण सिरसाठ यांनी प्रास्ताविक केले, तर कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे



यांनी आपल्या मनोगतात अण्णाभाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाच्या विचारांचा समाजाने अंगीकार करून ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याला *(पान २ वर)*

## राजुरेश्वर जिनिंगचे शटर उचकटवुन चोरी करणारे ०३ आरोपी तर चोरीचा माल विकत घेणारे ०२ भंगार विक्रेते जेरबंद

### रु.४,५०,०००/- किंमतीचा मुददेमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा व हसनाबाद पोलीस ठाणेची संयुक्त कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्हयातील चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीर सिंह संधू साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते.


फिर्यादी नामे उमेश जिन्नसराव पुंगळे, वय-३३ वर्ष, व्यवसाय



मॅनेजर (जिनिंग), रा. राजुर ता. भोकरदन जि. जालना यांनी पोलीस ठाणे हसनाबाद जालना येथे फिर्याद दिली की, दिनांक ०३/०७/२०२६ रोजी रात्री १०.०० वा. ते ०४/०७/२०२६ रोजी सकाळी ०६.३० वाजेच्या दरम्यान राजुर ते भोकरदन जाणाऱ्या रोडवरील राजुरेश्वर जिनींगमधील स्टोअरमधुन ७५ लोखंडी वेट गड्ड अज्ञात चोरट्याने चोरुन नेले वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे हसनाबाद, जालना गुरनं. १९७/२०२६ कलम ३०३(२), ३३४(१) भान्यास प्रमाणे दाखल झाला होता.

सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण व गुप्तबातमीदाराच्या मदतीने माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १) शाम विष्णु सन्यासी, वय-३५ वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना २) लहु धोंडीराम पवार, वय-४० वर्ष, रा.सुंदरनगर, चंदनझिरा जालना ३) सय्यद अफरोज सय्यद हसन, वय-३५ वर्ष, रा. बावला पार्क *(पान २ वर)*

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात MY Bharat पोर्टल नोंदणी अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद





**जालना - प्रतिनिधी**

माय भारत, जालना, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या अंतर्गत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात चे यशस्वी आयोजन करण्यात आले. या अभियानाचा उद्देश जास्तीत जास्त युवकांना या राष्ट्रीय युवा व्यासपीठाशी जोडून त्यांना स्वयंसेवा, कौशल्य विकास, नेतृत्व विकास, प्रशिक्षण तसेच विविध शासकीय योजनांच्या संधींबाबत जागरूक करणे हा होता.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पोर्टलचे महत्त्व, उद्दिष्टे आणि त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या विविध संधींची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईलद्वारे प्रत्यक्ष पोर्टलवर नोंदणी करून देण्यात आली. स्कॅन करून नोंदणी प्रक्रिया, प्रोफाइल पूर्ण करण्याची पद्धत आणि भविष्यातील विविध उपक्रमांमध्ये सहभाग कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने नोंदणी केली.

सदर उपक्रमाचे आयोजन मयुरकुमार गोरमे, जिल्हा युवा अधिकारी, , जालना आणि प्रभारी प्राचार्य प्रा. विलास भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी युवकांनी पोर्टलशी जोडून राष्ट्रनिर्मिती, सामाजिक सेवा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक *(पान २ वर)*

# संपादकीय....

## विक्रमी महसूल ही सुरुवात... आता नागरिकांना विकासाचे प्रत्यक्ष फलित हवे!

जालना महानगरपालिकेच्या विविध मक्त्यांच्या जाहीर लिलावातून तब्बल ₹८५.७५ लाखांचा विक्रमी महसूल मिळणे ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने हा सकारात्मक टप्पा मानला पाहिजे. मात्र या यशाचे खरे मूल्यमापन महसूल किती मिळाला यावर नव्हे, तर तो शहराच्या विकासासाठी किती प्रभावीपणे आणि पारदर्शकपणे खर्च झाला यावर होणार आहे. महानगरपालिकांची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस आव्हानात्मक बनत असताना स्वतःचे उत्पन्न वाढविणे ही काळाची गरज आहे. मालमत्ता, बाजारपेठा, उद्याने आणि इतर सार्वजनिक साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करून महसूल वाढविणे ही सक्षम प्रशासनाची ओळख असते. या पार्श्वभूमीवर जालना मनपेने जाहीर लिलावाद्वारे मोठा महसूल मिळविला, ही बाब निश्चितच प्रशंसनीय आहे. विशेष म्हणजे आयुक्त अंजली शर्मा यांच्या दालनात प्रथमच खुल्या आणि पारदर्शक पद्धतीने लिलाव प्रक्रिया पार पडल्याचा दावा करण्यात आला आहे. जर ही पारदर्शकता प्रत्यक्षातही तितक्याच काटेकोरपणे पाळली गेली असेल, तर ती भविष्यातील प्रशासनासाठी आदर्श ठरू शकते. कारण सार्वजनिक मालमत्तांच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता ही केवळ प्रशासनाची प्रतिमा उंचावणारी बाब नसून नागरिकांचा विश्वास संपादन करणारे सर्वात प्रभावी माध्यम आहे.

परंतु या यशासोबत काही महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित होतात. विक्रमी महसूल मिळाल्यानंतर तो नेमका कोणत्या विकासकामांसाठी खर्च होणार? त्याचे नियोजन काय असेल? कोणत्या प्राधान्यक्रमाने निधी वापरला जाईल? याबाबतही मनपाने स्पष्ट आराखडा नागरिकांसमोर ठेवण्याची गरज आहे. केवळ महसूल वाढल्याच्या घोषणा करून चालणार नाही; त्या महसुलाचा लाभ सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात दिसला पाहिजे. आज जालना शहरासमोर पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, वाहतूक कोंडी, उद्यानांची देखभाल आणि मूलभूत नागरी सुविधांचे अनेक प्रश्न उभे आहेत. त्यामुळे नव्याने मिळालेला महसूल या अत्यावश्यक कामांकडे वळविला गेला, तरच नागरिकांना या लिलावाचे महत्त्व जाणवेल. दुसरीकडे, महसूल वाढविण्यासाठी मक्तेदारांवर मोठा आर्थिक भार पडत असेल, तर त्याचा परिणाम बाजारातील व्यापारी आणि शेवटी सामान्य ग्राहकांवर होणार नाही ना, याचाही विचार प्रशासनाने करणे आवश्यक आहे. मक्त्यांच्या नावाखाली व्यापाऱ्यांवर अतिरिक्त शुल्काचा बोजा पडू नये आणि त्यातून नागरिकांना आर्थिक फटका बसू नये, यासाठीही प्रभावी देखरेख गरजेची आहे.

महापालिकेच्या आर्थिक स्वावलंबनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. मात्र त्याचवेळी महसूल मिळविण्याइतकेच महत्त्वाचे म्हणजे त्या पैशाचा सुयोग्य, प्रामाणिक आणि परिणामकारक वापर. नागरिकांनी भरलेला प्रत्येक रुपया पुन्हा नागरिकांच्याच सुविधांवर खर्च झाला, तरच प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. जालना महानगरपालिकेने विक्रमी महसूल मिळवून एक सकारात्मक संदेश दिला आहे. आता पुढची खरी परीक्षा या निधीच्या नियोजनाची, खर्चातील पारदर्शकतेची आणि विकासकामांच्या गुणवत्तेची आहे. महसूलाची आकडेवारी कागदावर चमकण्यापेक्षा शहरातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक सुविधा सुधारताना दिसल्या, तरच हा लिलाव खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

## लोकप्रिय खा. डॉ. कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालयात नेत्र शस्त्रक्रिया शिबिर

### रुग्णांना चष्मे व पुष्पगुच्छांचे वाटप; मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वी



**जालना । प्रतिनिधी**

लोकप्रिय खासदार डॉ. श्री. कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांची मालिका सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून शनिवार, दि. १८ जुलै २०२७ रोजी जालना येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात नेत्र शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. तसेच शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला आणि त्यांना चष्म्यांचेही वाटप करण्यात आले.

हे शिबिर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर आणि डॉ. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. डॉ. यू. एल. पारितकर, डॉ. साळुंखे आणि डॉ. आंबेकर यांनी रुग्णांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे करून अनेकांना नवदृष्टी दिली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती राऊत (सिस्टर), श्रीमती अनिता उगले (सिस्टर), श्रीमती इंगळे (सिस्टर), नेत्र चिकित्सा अधिकारी सतीश भाषा, उमेश सकळ आणि एस. बी. पगारे यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराचे संयोजन अशोकराव उबाळे आणि राजेंद्र गोरे यांनी केले.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याणराव दळे, शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, प्रदेश काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे उपाध्यक्ष बदर चौस, संजय इंगळे, संजय मुथा, रघुवीर गुडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच त्यांना आवश्यक चष्म्यांचे वाटप करून त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. खासदार डॉ. कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता आरोग्यसेवेशी निगडित उपक्रम राबविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. या नेत्र शस्त्रक्रिया शिबिरामुळे अनेक गरजू रुग्णांना गुणवत्तापूर्ण उपचाराची संधी मिळाली असून, सामाजिक बांधिलकी जपत जनसेवेचा संदेश देण्यात आला.

# पान १ व ४ वरुन...

### शेतकरी, गरीब...

निळकंठ वायाळ, शिवसेनेचे रमेश पाटील गव्हाड, हनुमंत धांडे, जयप्रकाश चव्हाण, रुपम घुगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे बबलू चौधरी, संजय काळबांडे यांच्यासह विविध तालुकाध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले तसेच खा. काळे यांची लाडू तुला करण्यात आली.

''विरोधकांना जाणीवपूर्वक निधीपासून दूर ठेवले जात आहे''

भाषणात खा. काळे यांनी महायुती सरकारवर थेट निशाणा साधला. विरोधी पक्षातील आमदार, खासदार आणि महाविकास आघाडीच्या लोकप्रतिनिधींना विकास निधी जाणीवपूर्वक दिला जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. जनहिताच्या विकासकामांकडेही राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात असल्यामुळे जनतेच्या हक्कांसाठी संघर्ष उभारण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी सांगितले.

''हा संघर्ष केवळ काँग्रेस किंवा महाविकास आघाडीसाठी नाही, तर शेतकरी, गरीब, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी आहे,'' असे ते म्हणाले. ''२०२९ मध्ये परिवर्तन निश्चित'' आगामी निवडणुकांबाबत बोलताना खा. काळे म्हणाले की, २०२९ ची निवडणूक काँग्रेससाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाला जनता कंटाळली असून देशात परिवर्तनाची लाट निर्माण होईल. जनतेच्या विश्वासाच्या बळावर काँग्रेस पुन्हा सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीवर टीका शनिवारी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचाही त्यांनी उल्लेख केला. विकास आराखडे, निधी आणि जनहिताच्या प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षित असताना बैठकीत प्रशासकीय मान्यतेच्या पत्रांवरून वाद घालण्यात वेळ वाया गेल्याचा आरोप त्यांनी केला. यापूर्वी झालेल्या खरीप हंगाम आढावा बैठकीतही शेतकऱ्यांच्या प्रश्नांपेक्षा इतर विषयांवरच अधिक चर्चा झाल्याचे सांगत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. ''शेतकरी संकटात आहे, बेरोजगार युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत आहे; मात्र सरकारला श्रेयवाद आणि राजकीय वर्चस्व महत्त्वाचे वाटत आहे,'' असा टोला त्यांनी लगावला. भाजपमध्ये समन्वय नसल्याचा दावा

''हाताच्या बांगड्यांना आरसा कशाला'' या म्हणीचा उल्लेख करत भाजपमध्येच समन्वयाचा अभाव असल्याचा दावा त्यांनी केला. राज्यातील सत्ताधारी पक्षांमध्ये अंतर्गत मतभेद असल्यामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याचेही त्यांनी सूचित केले. अहिल्यादेवी होळकर पुतळा आणि शिवस्मारकाचा मुद्दा

जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात प्रस्तावित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या रखडलेल्या कामाचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. या संदर्भात पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्याशी चर्चा झाली असून, त्यांनी हे काम लवकर सुरू करण्याचे आश्वासन दिल्याचे काळे यांनी सांगितले. याचबरोबर, पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम अद्याप पूर्ण का झाले नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

''आंदोलने करा, अन्यथा जनता प्रश्न विचारेल'' कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''मी तुमच्या पाठीशी ठामपणे उभा आहे आणि तुम्ही माझ्या पाठीशी आहात. त्यामुळे कोणतीही चिंता करू नका. सत्ता निधी रोखू शकते; पण जनतेचा विश्वास रोखू शकत नाही.''

ते पुढे म्हणाले, ''जर आपण शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलने, मोर्चे काढले नाहीत, तर जनता आपल्यालाच विचारेल की, आमच्यासाठी तुम्ही काय केले? त्यामुळे जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात पदाधिकाऱ्यांनी जनआंदोलने उभारावीत.''

राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी आखलेल्या राजकीय रणनीतीची अंमलबजावणी आगामी काळात करायची असल्याचेही त्यांनी सांगितले. भाजपमध्ये जाण्याच्या चर्चांना पूर्णविराम

आपल्या पक्षांतराच्या चर्चांवरही त्यांनी भाष्य केले. ''मी भाजपमध्ये जाणार असल्याच्या किंवा जालना लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार नसल्याच्या अफवा मुद्दाम पसरवल्या जात आहेत. या सर्व बातम्या पूर्णपणे निराधार आहेत. आगामी लोकसभा निवडणूक मी जालना मतदारसंघातूनच लढविणार आहे,'' असे स्पष्ट करून त्यांनी सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. बूथस्तरावर संघटन मजबूत करण्याचे आवाहन मतदार यादी पुनरावलोकनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पात्र मतदाराचे नाव यादीत समाविष्ट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. राहुल गांधी यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला असून आगामी निवडणुकांसाठी प्रत्येक गावात आणि प्रत्येक बूथवर संघटन मजबूत करण्याचे निर्देश त्यांनी दिले. अधिवेशनानंतर प्रत्येक गावात दौरा विधानमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावात जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधणार असल्याची घोषणाही खा. डॉ. कल्याण काळे यांनी केली. त्यांच्या या घोषणेला उपस्थित कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाविकास आघाडीच्या या अभिष्टचिंतन सोहळ्यात विविध घटक पक्षांचे शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सामाजिक उपक्रमांसह संघटनात्मक एकजूट आणि आगामी राजकीय रणनीतीवरही विशेष भर देण्यात आला.

### बद्रीनारायण बारवाले...

कु. हितीशा खिलोशिया यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. ओम चव्हाण (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना), प्रा.निधी शुक्ला (), डॉ. स्वाती पुरी (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना), प्रा. रामेश्वर म्हस्के,(कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना), प्रा. कुणाल देशपांडे, प्रा. कुंभार , प्रा.कांचन कायंदे (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना), युवा बहुउदेशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड व महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

### राजुरेश्वर जिनिंगचे....

चंदनझिरा, जालना यांनी केला आहे. त्यानुषंगाने त्यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयातील मुददेमाल आरोपीतांनी भंगार विक्रेते ५) अन्वर खान गफुर खान, वय-४० वर्ष, रा. टड्डुपुरा, जालना ६) शेख नासेर शेख लतीफ, वय-३८ वर्ष, रा. दुःखीनगर, जुना जालना यांना विक्री केल्याचे सांगितल्याने दोन्हीही भंगार विक्रेते यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी नावः-

शाम विष्णु सन्यासी, वय-३५ वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना, लहु धोंडीराम पवार,

वय-४० वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा जालना, सय्यद अफरोज सय्यद हसन, वय-३५ वर्ष, रा. बावला पार्क, चंदनझिरा, जालना, अन्वर खान गफुर खान, वय-४० वर्ष, रा. टड्डुपुरा, जालना, शेख नासेर शेख लतीफ, वय-३८ वर्ष, रा.दुःखीनगर, जुना जालना

**जप्त मुददेमालः-**

१. रु.४,००,०००/- गुन्हा करण्यासाठी वापरलेली महेद्रा बोलेरो पिकअप क्र. ४८३०८५ जु.वा.कि.अ.

२. रु.५०,०००/- किंमतीचे गुन्हा करतांना वापरलेले आरोपीतांचे ०४ मोबाईल

**एकुण मुद्देमाल :- रु.४,५०,०००/-**

कारवाई करणारे अधिकारी व अंमलदार सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, हसनाबाद पोलीस ठाणे प्रभारी सपोनि. श्री. योगेश उबाळे, सपोनि. श्री. सचिन खामगळ, पोउपनि. श्री. राजेंद्र वाघ व पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, इरशाद पटेल, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, आक्कुर धांडगे, रमेश काळे, सुनिल पवार सर्व स्थानिक गुन्हे शाखा व हसनाबाद पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार दुर्गेश राठोड व अविनाश मांटे यांनी केली आहे.

### जिल्हा नियोजन...

उपस्थित केला. तसेच मोठ्या कंत्राटदारांवर कारवाई होत नसताना एका छोट्या ट्रॅक्टर चालक व त्याच्या पत्नीवर कठोर गुन्हा दाखल करण्यात आल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला.

लोकप्रतिनिधींची नाराजी ही पालकमंत्र्यांवर नसून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर असल्याचे सांगत, आमदारांच्या शिफारशींना प्रतिसाद मिळत नसल्याची आणि विकासकामांच्या फाईली प्रलंबित ठेवल्या जात असल्याची तक्रारही त्यांनी केली. सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत पालकमंत्र्यांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. सर्व प्रश्न शांततेने मांडावेत आणि प्रशासनाने लोकप्रतिनिधींच्या सूचनांची योग्य दखल घ्यावी, असे त्यांनी सांगितल्याचे लोणीकर यांनी नमूद केले.

### विमान वेळेआधी...

देणे हे विमान कंपनीचे मूलभूत कर्तव्य आहे. कंपनीने हे कर्तव्य पार न पाडल्याने प्रवाशांना परदेशात प्रचंड मानसिक त्रास, गैरसोय आणि आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला. जिल्हा आयोगाने दिलेली ७,००० रुपयांची नुकसान भरपाई अत्यंत अपुरी असल्याचे मत नोंदवत राज्य आयोगाने प्रवाशांना झालेल्या त्रासाची गंभीर दखल घेतली.

आयोगाचे अध्यक्ष राज शेखर अत्री आणि सदस्य प्रीतिंदर सिंग यांच्या खंडपीठाने जिल्हा आयोगाच्या आदेशात बदल करत नुकसान भरपाईची रक्कम ७,००० रुपयांवरून ५०,००० रुपयांपर्यंत वाढवली. यासोबतच, तक्रारदारांना आलेला कायदेशीर लढ्याचा खर्च म्हणून १५,००० रुपये देण्याचे आदेश दिले. तिकिटाची मूळ रक्कम ५८,६४१ रुपये ९% व्याजासह परत करण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला. आदेशाची ४५ दिवसांत अंमलबजावणी न केल्यास, थकीत रकमेवर १२% व्याज आकारले जाईल, असेही आयोगाने स्पष्ट केले.

या निकालाचे स्वागत करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस धन्नावत म्हणाले, ''हा निकाल ग्राहक हक्कांचा एक मोठा विजय आहे. विमान कंपन्यांनी प्रवाशांना गृहीत धरू नये, यासाठी हा एक महत्त्वाचा धडा आहे. सेवेतील त्रुटीमुळे ग्राहकांना होणाऱ्या मानसिक आणि आर्थिक नुकसानीची योग्य भरपाई मिळायलाच हवी, हे या निकालाने अधोरेखित केले आहे. या निर्णयामुळे इतर ग्राहकांनाही आपल्या हक्कांसाठी लढण्यास प्रोत्साहन मिळेल आणि सेवा पुरवठादार कंपन्या अधिक जबाबदारीने वागतील.''

### मुख्यमंत्री देवेंद्र...

सभापती सौ.संध्या देठे, नगरसेविका सौ.सुलोचना गोरडे, पाणी पुरवठा उपसभापती भगवान चांदोडे, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास ३० दात्यांनी या शिबिरात सहभागी होत रक्तदान केले. याशिवाय मुक्तेश्वर संस्थान परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. दरम्यान, मतदार यादी पूर्ननिरीक्षण प्रक्रिया राबवणाऱ्या जिल्हा प्रशासनाला सहकार्य व्हावे आणि मतदारांचीही होणारी परवड थांबावी हा हेतू समोर ठेवून शहरातील प्रभाग क्रमांक ११,१३ आणि १४ मधील मतदारांसाठी मुक्तेश्वर लॉन्स येथे मतदार यादी पूर्ननिरीक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या स्थळी मतदार यादी पूर्ननिरीक्षण प्रक्रिया राबवणाऱ्या बीएलओंसाठी ५० टेबलवर स्वतंत्रपणे व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे उपरोक्त तिन्ही प्रभागातील मतदारांना मतदान पूर्ननिरीक्षण प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोठी मदत झाल्याचे दिसून आले. या कार्यक्रमास सुजितकुमार जोगस, विजय पांगारकर, निलेश गोरडे, रणजीत मगरे, प्रतीक पांगारकर, विशाल वाघमारे, संजय देठे, देविदास देशमुख, राजेश जोशी, सुनील पांगारकर,संतोष खेरूडकर, राजू शेलार, शिवराज जाधव, शिवराज नारियलवाले, सुमित सुरडकर, सुनील एखंडे, विठ्ठल देवकाते, मुकेश राठोड, दीपक शेळके, शुभम बोरुडे, सुमित चव्हाण, अनिकेत वैद्य, विनोद दळवी, यश सतकर, लक्ष्मण खाडे, धीरज मेवाडे, रमेश गाडे, प्रेम काळे, गजानन वाघ, डॉ.वसीम सय्यद, संदीप गायकवाड आदींची उपस्थिती होती.

### अनुसूचित जातींच्या ...

होणार असून, हा मोर्चा जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या मोर्चांपैकी एक ठरेल. हजारो नागरिक, महिला, युवक, विद्यार्थी, विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते या मोर्चात सहभागी होणार असल्याचा दावा त्यांनी केला. या मोर्चाचे नेतृत्व आनंदराज आंबेडकर, डॉ. भीमराव आंबेडकर हे करीत असून प्रामुख्याने आमदार राजकुमार बडोले, माजी मंत्री बबनराव घोलप, ॲड. सुरेश माने यांची उपस्थिती असणार आहे. मस्तगड येथून मोर्चाची सुरुवात मंगळवार, दि. २१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता मस्तगड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चास प्रारंभ होईल. शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करत हा मोर्चा अंबड चौफुली येथे सभेमध्ये रूपांतरित होईल. त्यानंतर प्रतिनिधी मंडळ जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन उपवर्गीकरणाच्या विरोधातील निवेदन सादर करणार आहे. यावेळी आयोजकांनी जालना जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी समाजबांधव, अनुसूचित जातीतील ५९ जातींचे नागरिक, सामाजिक संघटना, युवक, महिला व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सामाजिक ऐक्याचा संदेश देण्याचे आवाहन केले.

पत्रकार परिषदेला मोर्चा आयोजन समितीचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे...

अभिवादन करत समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी समितीचे अध्यक्ष किरण सिरसाठ, उपाध्यक्ष इब्राहिम शेख, कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे, सचिव संतोष मच्छिंद्र रासवे, संजू गायकवाड, शिवसेना संपर्क प्रमुख पंडितदादा भुतेकर, संतोष निकाळजे, किशोर कांबळे, संतोष तुपसुंदर, डी. ई. नामवड, संतोष कांबळे, रवी शोरात, ओंकार घोडे, मयूर गोफणे, राम सुतार, गणेश चौधरी, अशोक तांवे, राहुल जाधव, राजेश सगट, आकाश दळीजे, जय आठवले, दिपक आमीलढंगे आणि अंकुश यंगड यांच्यासह समितीचे पदाधिकारी, विविध पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सचिव संतोष मच्छिंद्र रासवे यांनी मानले.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह...

विशाल धानुरे, सचिन वानखेडे, नितीन तायडे, दशरथ तोंडुळे, निवृत्ती गायके, निलेश वानखेडे, संदीप जैवळ, भगवान खरात, शिवकुमार राऊत, गंगुबाई वानखेडे, मंगला खांडेभराड, रंगनाथ वानखेडे, अनिल वाघमारे, राहुल रायकर, गणेश वाघमारे, अशोक खांडेभराड, संतोष राजपुत, रामभाऊ जाधव, आणि राजु जाधव यांची निवड करण्यात आली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रभाकर हरिभाऊ मगर होते. तसेच दिपक वैद्य, राजु विठ्ठल खरात, रामभाऊ शेषराव पाऊलबुध्दे, रामेश्वर खांडेभराड, बंडु कुदळे, मदन खरात यांच्यासह माळी समाज आणि वारकरी संप्रदायाचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा अभूतपूर्व करण्यासाठी संपूर्ण जालना जिल्ह्यातून समाज बांधवांनी एकत्र येण्याचे आवाहन समितीने केले आहे.

### नीट परीक्षेत...

आणि हितचिंतक यांच्या मार्गदर्शनाचा हा परिपाक आहे.''✻ तिच्या या यशाने केवळ बिल्हारे कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण परिसराची मान अभिमानाने उंचावली आहे. कु. माधवी उद्धव बिल्हारे हिच्या या कौतुकास्पद कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील वैद्यकीय प्रवासासाठी व उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

यावेळी उपस्थित श्री.आसारामजी डव्हारे, श्री.रंजित डव्हारे, श्री.विश्वनाथ मुळे, श्री.कारभारी बिल्हारे,श्री.आसाराम बिल्हारे, श्री.भानुदास बिल्हारे, श्री.नरहारी बिल्हारे,श्री.त्र्यंबकराव बिल्हारे, श्री.विठ्ठल बिल्हारे, श्री.उध्दव बिल्हारे, श्री.तुळशीदास बिल्हारे, श्री.राम बिल्हारे, श्री.लक्ष्मण बिल्हारे, श्री.कृष्णा बिल्हारे, श्री.ऋषिकेश बिल्हारे, श्री.सतिश बिल्हारे, श्री, शेषनारायण बिल्हारे समस्त बिल्हारे परिवार व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

✻ परीक्षेत ५१० गुण मिळवून घवघवीत यश संपादन केलेली भावी डॉक्टर कु. माधवी उद्धव बिल्हारे.✻

### ब्राह्मण सभेत...

व्यक्त केला. यावेळी अध्यक्ष रमेश देहेडकर, सचिव आर. आर. जोशी, सिद्धीविनायक मुळे, रवींद्र देशपांडे, शिवाजी जोशी, गजानन कुलकर्णी, प्रसाद पाटील, मिलिंद जहागीरदार, प्रमोद जोशी तसेच ब्राह्मण समाजातील मान्यवर आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वर्गीय अजितदादा...

एडवोकेट नाजेर काझी आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे .

दिनांक २४ जुलै २०२६ शुक्रवार रोजी सकाळी दहा वाजता जिल्हा महिला बाल रुग्णालय येथे फळ वाटपाचा कार्यक्रम ( संयोजक - अण्णासाहेब चितेकर ) दिनांक २५ जुलै २०२६ शनिवार रोजी सकाळी दहा वाजता ह. मियासाहाब दर्गा शरीफ येथे वृक्षारोपण ( संयोजक - शिवराज जाधव , शेख मुजम्मिल ) दिनांक २६ जुलै २०२६ रविवार रोजी सकाळी साडेनऊ वाजता जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय येथे रक्तदान शिबिर ( संयोजक - मिर्झा अन्वर बेग ) दिनांक २६ जुलै रविवार सकाळी ११ वाजता क्रीडा प्रबोधिनी गांधी चमण जुना जालना येथे कबड्डीपटूंचा सत्कार व कीट वाटप ( संयोजक - सोपानराव तेलगड , प्रशांत तेलगड ) सदरील कार्यक्रमास पक्षाचे प्रदेश पदाधिकारी , महिला प्रदेश पदाधिकारी , जिल्हा पदाधिकारी व सर्व सेलचे जिल्हाध्यक्ष व पक्षाचे मान्यवर नेते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत यावेळी पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शेख मेहमूद , प्रदेश युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस धैर्यशील चव्हाण , शहा आलम खान , प्रभाकर घेवंदे , मंगलताई पाटील , सतीश वाहुळे ,विजय सोनवणे , रिंकल तायड , शितल बारोटे , पद्माकर हांडे , संतोष ढेंगळे , सुनील सोनवणे , अजीम बागवान ,ललीत कुचेकर , पप्पु खान , मनोज गुडेकर , आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेची ठाम भूमिका : नांदेड येथील शिक्षक आत्महत्या प्रकरणाची SIT चौकशी करा

**जालना । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील शिक्षक स्व. सुनील मोरे यांनी आपल्या दोन निष्पाप मुलांसह केलेल्या हृदयद्रावक आत्महत्येच्या घटनेबाबत अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना यांनी तीव्र संताप व्यक्त करत राज्य शासनाकडे विशेष तपास पथक () मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष शेख मोहम्मद हनीफ व राज्य सचिव शेख जमीर रजा यांच्या स्वाक्षरीने मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविण्यात आले आहे. या निवेदनात आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या सर्व संबंधित अधिकारी व दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या गंभीर घटनेवर प्रतिक्रिया देताना संघटनेचे राज्याध्यक्ष मोहम्मद हनीफ यांनी सांगितले की, ''एका शिक्षकाला मानसिक छळ व प्रशासकीय अन्यायामुळे आपल्या दोन निष्पाप मुलांसह आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागणे ही अत्यंत दुर्दैवी व संपूर्ण शिक्षण व्यवस्थेला काळीमा फासणारी घटना आहे. या प्रकरणातील सत्य बाहेर येण्यासाठी निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होणे अत्यावश्यक आहे.

## वीजबिलांच्या महाघोटाळ्यावर मुख्यमंत्र्यांचा राजीनामा हवा; चुकीच्या बिलांचे ढोंग आणि शेतकरी-जनतेची लूट तात्काळ थांबवा: ॲड. महेश धन्नावत

**जालना - प्रतिनिधी**

"महाराष्ट्राची बदनामी करू नका, पाहिजे तर माझी बदनामी करा," अशी भावनिक हाक देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या कार्यकाळात आज महाराष्ट्र आणि विशेषतः जालना जिल्हा वीजबिलांच्या भीषण आणि भोंगळ कारभाराने होरपळत आहे. राज्याचे ऊर्जामंत्री पदही स्वतःकडेच राखणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी जनतेला लुटणाऱ्या या यंत्रणेची नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी तिखट मागणी प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे.

**चुकीच्या बिलांचे विंडो ड्रेसिंग आणि लुटालूट**

सरकारकडून ४८,००० कोटी रुपयांच्या वीजबिल माफीची जी घोषणा केली जात आहे, ती केवळ एक निव्वळ धूळफेक आणि विंडो ड्रेसिंगचा प्रकार आहे. जालन्यातील सामान्य जनता आणि शेतकऱ्यांना गेल्या अनेक वर्षांची, दशकांपूर्वीची थकबाकी आता भरण्यास सांगून वेठीस धरले जात आहे. ॲड. धन्नावत यांनी अत्यंत आक्रमकपणे सवाल केला आहे की, जर जुनी बिले प्रलंबित होती, तर मग त्याच जागेवर नवीन वीज मीटर दिलेच कसे गेले? गेल्या कित्येक वर्षांपासून महावितरणचा हा विभाग काय झोपा काढत होता? आज वीज विभागाच्या या चुकीच्या नियोजनाचा आणि भ्रष्टाचाराचा बोजा मात्र सामान्यांच्या खिशावर लादला जात आहे.

**शेतकऱ्यांच्या घरात अंधार, अन् सरकार मात्र गप्प!**

एकीकडे वीजबिल माफीचे ढोंग रचले जात असताना, प्रत्यक्षात मात्र जालन्यातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या घरगुती वीज जोडण्या कापल्या जात आहेत. चुकीच्या बिलांमुळे त्रस्त झालेला शेतकरी आज हतबल झाला आहे. या अमानवी परिस्थितीवर राज्याचे मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ काम करणे गरजेचे आहे. मात्र, या परिस्थितीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पूर्णपणे मौन पाळले आहे. महाराष्ट्रातील विशेषतः जालन्यातील ही भयावह स्थिती पाहताना दिल्लीतील या नेत्यांनी आपल्या डोळ्यांवर, कानांवर आणि तोंडावर हात का ठेवले आहेत? जनतेला लुटले जात असताना हे मौन कोणासाठी, हा प्रश्न आता कळीचा ठरत आहे.

**खासदार कल्याण काळेंची दुबई वारी आणि जनतेचा छळ**

दुर्दैवाची बाब म्हणजे, जालन्यातील जनता जेव्हा चुकीच्या बिलांनी आणि महावितरणच्या अन्यायाने त्रस्त आहे, तेव्हा जालन्याचे खासदार कल्याण काळे मात्र जनतेच्या समस्या सोडवण्याऐवजी स्वतःचे कल्याण करण्यात मग्न आहेत. जनता हलाखीचे जीवन जगत असताना खासदार महोदय दुबई ट्रिपवर जाऊन आनंद लुटत आहेत, ही जालन्याच्या जनतेची क्रूर थट्टा आहे. "मुख्यमंत्र्यांनी आता तरी जागे व्हावे आणि वीज विभागाचा हा भोंगळ कारभार आवरून जनतेला अचूक बिले द्यावीत. चुकीची बिले पाठवून लूट करणे थांबवा, अन्यथा जनतेचा आक्रोश तुम्हाला खुर्चीवरून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही!" असा इशारा ॲड. महेश धन्नावत यांनी दिला आहे.

## पर्यावरणाबाबत गंभीर कधी होणार?

पर्यावरणाचे महत्त्व अजूनही बहुतांश लोकांना माहित नाही. म्हणून बहुतांश लोक पर्यावरणाबाबत म्हणावे तेवढे गंभीर व जागरूक दिसत नाहीत. पर्यावरणाची जीवापाड काळजी घेत नाहीत. ज्यांना मानवी जीवनाशी निगडित पर्यावरणाचे किती महत्त्व आहे? हे कळते ते लोक पर्यावरणाबाबत नेहमी जागरूक, सतर्क व गंभीर राहतात. पर्यावरणाला धोका पोहोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतात. पर्यावरण प्रेमी बनून पर्यावरणाला जीवापाड जपतात. पर्यावरणाचे संरक्षण करतात आणि समाज बांधवांना, गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देतात.

आता पर्यावरण म्हणजे काय? हा प्रश्न प्रत्येकाला पडलाच असेल. तर हवा, पाणी, जमीन, वनस्पती, प्राणी आणि मानव या सर्वांचा समावेश पर्यावरणात होतो. हवा, पाणी, वनस्पती आणि प्राणी यांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या बहुतांश गाड्या, औद्योगिक कारखाने, जीवाश्म इंधनांचे ज्वलन हे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात. देशात वायू प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा सुळसुळाट आणि औद्योगिक कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांना स्वच्छ व शुद्ध ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे. म्हणून याचा परिणाम थेट मानवी आरोग्यावर होत आहे. आणि मानवी जीवन धोक्यात येत आहे. वायु प्रदूषण ही समस्या देशात खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वायु प्रदूषण टाळायचे असेल आणि आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर आपल्याला पहिल्यांदा पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या सर्व वाहनांवर बंदी घालावी लागेल आणि सीएनजी, इथेनॉल आणि विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्राधान्य द्यावे लागेल. तसेच औद्योगिक कारखाने प्रदूषण मुक्त कसे चालवता येतील? यावर सुद्धा विचार मंथन व्हावे लागेल.

हल्ली देशात वृक्षतोड मोठ्या प्रमाणात केली जात आहे. मोठमोठी जंगले नष्ट करून लोक त्या ठिकाणी प्लॉटिंग पाडत आहेत. आणि मोठमोठे उद्योग धंदे आणि वसाहती बसवत आहेत. याचा परिणाम थेट मानवी जीवनावर होत आहे. वृक्षतोड केल्यामुळे पाऊस वेळेवर पडत नाही. पडला तरीही नुसते फवारेच नाहीतर पडतच नाही. अशी विदारक परिस्थिती सध्या महाराष्ट्रात उद्भवली आहे. सध्या महाराष्ट्राच्या काही भागात मनाजोगा मुबलक पाऊस पडत आहे तर काही भागात अजून पावसाचा पत्ता नाही. जिकडे झाडे आहेत तिकडे मात्र पाऊस चांगला बरसत आहे. ही आनंदाची बाब आहे परंतु खेदाची बाब अशी की, बहुतांश लोकांना झाडांचे महत्त्व माहीत नसल्यामुळे ते मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करत आहेत. पावसाचा आणि वृक्षांचा एकमेकांशी असणारा जवळचा संबंध जर लोकांना माहीत असता तर लोकांनी वृक्षतोड कधीच केली नसती. त्यासाठी प्रशासनाने गावोगावी व खेडोपाडी जाऊन वृक्ष लागवड मोहीम राबवावी. वृक्षांचे महत्त्व लोकांना समजावून सांगावे. वृक्षतोड करणाऱ्यास कठोर शासन करायला हवे. एक माणूस एक झाड ही संकल्पना राबवावी. झाडे लावल्याशिवाय पाऊस पडणार नाही हे लक्षात घेऊन प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून व त्याचे संगोपन करून पर्यावरणाला अधिक मजबूत करूया.

आता सध्या महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. मृग नक्षत्राला प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस पडलाच नाही. काही शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली तर काही शेतकऱ्यांनी अजूनही पेरणी केलीच नाही. पावसाळा हा ऋतू आता संपत येत आहे. तरीसुद्धा मराठवाडा अजूनही कोरडाठाक आहे. याला आपणच जबाबदार आहोत परंतु आपण निसर्गाला दोष देत आहोत. आपण मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केलीच नसती आणि पर्यावरणाला अबाधित ठेवले असते तर अशी दुष्काळजन्य परिस्थिती आपल्यावर आलीच नसती. आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. आता गरज आहे आपल्याला पर्यावरणाचे महत्त्व जाणून घेण्याची. आणि खूप खूप वृक्ष लागवड करून पावसाला निमंत्रण देण्याची. त्यासाठी आपल्याला पर्यावरणाबाबत गंभीर होणे काळाची गरज आहे. आपण पर्यावरणाबाबत गंभीर नसल्यामुळे आपल्यावर ही परिस्थिती ओढवली आहे. आपण जोपर्यंत पर्यावरणाबाबत गंभीर होणार नाही आणि पर्यावरणाची काळजी घेणार नाही तोपर्यंत आपल्या वाट्याला सुखाचे दिवस येणार नाहीत. जर आपल्याला मनाजोगा मुबलक पाऊस पडावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने पर्यावरणाचे संतुलन अबाधित ठेवणे काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणाचे मोल वेळीच जाणून पर्यावरणाला अधिक मजबूत कसे बनवता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला गरज आहे ती पर्यावरणाबाबत गंभीर होण्याची आणि पर्यावरणाला अधिक सुंदर बनवण्याची...



**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## बालविकास प्राथमिक शाळेत पालक मेळावा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत शनिवार दि. १८ जुलै रोजी पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. विद्याताई कुलकर्णी ह्या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका सौ. कार्तिका मनोज इंगळे, सौ आनंदी अय्यर, दिपक दराडे, सौ सुलभा नाईक, सौ विजया जोशी, सचिव सौ. सुनंदा बदनापूरकर, कायदेशीर सल्लागार सौ. सुखदा देशपांडे, कोषाध्यक्ष सौ. मीरा देशपांडे, सौ. श्रद्धा देशपांडे, सौ. सुलभा सिपोरकर, सौ. मनिषा कुलकर्णी, सौ. दुर्गा अग्निहोत्री, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता परदेशी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते दिपक दराडे यांनी उपस्थित पालक व शिक्षकांना पाल्याचे उज्वल भविष्य कसे घडवता येईल? यासाठी विविध विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले.




यानंतर शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा व स्कॉलरशिपच्या परीक्षाबाबत माहिती शाळेतील सहशिक्षिका शुभांगी भूमकर यांनी दिली. याप्रसंगी पालक व त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी साधक- बाधक चर्चा करण्यात आली, पालकांच्या प्रतिक्रिया व सूचनांचीदेखील नोंद घेण्यात आली. शाळेतील सहशिक्षिका संध्या मुंढे- दराडे यांचा मुलगा आदित्य दिपक दराडे याची पुढील शिक्षणासाठी आयआयटी खरगपूर येथे निवड झाल्याबद्दल त्याचा महिला मंडळ व शाळेच्यावतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. विद्याताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला.

पाहुण्यांचा परिचय सहशिक्षिका सौ. वंदना आगळे यांनी दिला. सहशिक्षिका छाया मुधोळकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सहशिक्षिका अंजली पाऊलबुद्धे केले तर उपस्थितांचे आभार सहशिक्षक जॉय श्रीसुंदर यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अनधिकृत व्यवहारात ग्राहकाचा दोष नाही; बँकेनेच नुकसान भरपाई द्यावी!

**जालना - प्रतिनिधी**


क्रेडिट कार्डद्वारे झालेल्या अनधिकृत व्यवहारांमध्ये ग्राहकाने वेळेवर माहिती दिल्यास त्याची कोणतीही जबाबदारी असणार नाही, उलट बँकेलाच ग्राहकाचे संपूर्ण नुकसान भरून द्यावे लागेल, असा महत्त्वपूर्ण निकाल चंदीगड जिल्हा ग्राहक आयोगाने दिला आहे. या निकालामुळे बँकांच्या मनमानी कारभाराला मोठा चाप बसला असून, देशभरातील ग्राहकांसाठी हा एक आशेचा किरण ठरला आहे, असे प्रतिपादन नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी केले आहे. त्यांनी या निकालाचे स्वागत करत, यातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालना जिल्ह्यातील ग्राहकांनी बोध घेण्याचे आवाहन केले आहे.

चंदीगड येथील रूपम कुमार विरुद्ध एसबीआय कार्ड्स अँड पेमेंट सर्व्हिसेस लिमिटेड यांच्यातील ग्राहक तक्रार क्रमांक २५५/२०२१ मध्ये हा निकाल देण्यात आला. तक्रारदार रूपम कुमार यांच्या एसबीआय क्रेडिट कार्डवरून ७ डिसेंबर २०१७ रोजी सुमारे ११,००० रुपयांचे दोन व्यवहार झाल्याचे मेसेज त्यांना आले. हे व्यवहार आपण केले नसल्याचे लक्षात येताच, त्यांनी तात्काळ बँकेला कळवून कार्ड ब्लॉक केले. यानंतर त्यांनी बँकेकडे रीतसर तक्रार दाखल केली, सायबर पोलिसांना माहिती दिली आणि बँकिंग लोकपालाकडेही दाद मागितली. मात्र, एसबीआयने त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करत उलट त्यांच्याकडूनच व्याजासह ३५,५९४ रुपये वसूल केले आणि त्यांचे नाव सिबिल रेकॉर्डमध्ये डिफॉल्टर म्हणून नोंदवले. या प्रकरणी जिल्हा ग्राहक आयोगाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ६ जुलै २०१७ रोजीच्या परिपत्रकाचा आधार घेतला. या परिपत्रकानुसार, अनधिकृत इलेक्ट्रॉनिक व्यवहार झाल्याचे ग्राहकाने तीन दिवसांच्या आत बँकेला कळवल्यास ग्राहकाची जबाबदारी शून्य ( ) असते. अशा प्रकरणांमध्ये व्यवहार अधिकृत होता हे सिद्ध करण्याची जबाबदारी बँकेची असते, ग्राहकाची नाही. या प्रकरणात एसबीआय बँक आपली बाजू मांडण्यात आणि ग्राहकाचा दोष सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरली. बँकेने वेळेत उत्तर दाखल न केल्याने आयोगाने तक्रारदाराचे म्हणणे एकतर्फी ग्राह्य धरले.

आयोगाने एसबीआय बँकेला सेवा देण्यास कसूर केल्याचा ठपका ठेवत तक्रारदाराला मोठा दिलासा दिला. बँकेने तक्रारदाराकडून वसूल केलेली ३५,५९४ रुपयांची रक्कम १२ एप्रिल २०२१ पासून ९% व्याजासह परत करावी, त्यांचे नाव सिबिल रेकॉर्डमधून तात्काळ काढावे आणि झालेल्या मानसिक त्रासापोटी व कायदेशीर खर्चासाठी १०,००० रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, असा आदेश दिला. हा संपूर्ण आदेश ४५ दिवसांच्या आत अंमलात आणण्याचे निर्देशही बँकेला देण्यात आले आहेत.

## विठू माझा लेकुरवाळा; संगे गोपाळांचा मेळा!

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत.परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या हृदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठूराया.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक,वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे.त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरुवात



होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रस्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तिन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन "एकादशी देवता" उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८५ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरुपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकते नाही याची खंत त्यांना वाटु लागली.

ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाड्यातील चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुमान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे.आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजर जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गाठीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरि विठ्ठल! पांडुरंग हरि!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## भारुडकर सौ. सुनीता पल्लोड यांची ३१ वी वारी पूर्ण



**दत्ता देशमुख**

प्रसिद्ध भारुडकर सौ सुनीता रामनारायण पल्लोड यांनी सालाबाद प्रमाणे या वर्षी ही न चुकता आपल्या परिवार सह या वर्षी ३१ वी वारी पूर्ण करत आहे.महाराष्ट्र मधील सत्संगाचा सर्वात मोठा भक्तिमय सण सोहळा म्हणजे पंढरीची वारी मानल्या जातो. या वारी साठी सगळे जण आप आपल्या परीने सहकार्य करून ही वारी निर्विघ्न पार पाडण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत असतात.आषाढी वारी निमित्य विठु माऊलीच्या दर्शना साठी दिंडी क्रमांक ४५ माहेश्वरी दिंडी मध्ये सहभागी होवुन ह.भ प रामनारायण पल्लोड ह.भ प भारुड कर सौ सुनिता ताई पल्लोड यांनी.३१ वी पायी वारी पूर्ण केली करत असून त्यांच्या सोबत परिवार सदस्य सौरभ पल्लोड हे ही सामील झाले होते.

दैनिक युवा आदर्श दि. २०-०७-२०२६

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAMEFOR
PASSPORT ISSUANCE
**OLD NAME :**
**SUVARNKAR BALAJI VAIJINATHRAO**
**NEW NAME :**
**BALAJI VAIJINATH SUVARNKAR**
**ADDRESS : 2-19-50 UTAR GALLI, TIRUMALLA NIWAS KADRABAD, JALNA - 431 203, MO. 8657516999**

# जालन्यात येत्या १५ दिवसात सी एन जी उपलब्ध होणार - आ. अर्जुन खोतकर



दत्ता देशमुख

टेंभुर्णी - सी एन जी ची सुविधा आपल्या जालना जिल्ह्यात नसल्याने ही सुविधा सुरू करण्याची मागणी वाहनधारक मोठ्या प्रमाणात करत होते. कारण जालना जिल्हा इतका मोठा आणि सदन असून येथे ही सुविधा नसल्याने वाहन धारक सारखी मागणी केल्याने या विषयाकडे स्वतः हा आमदार अर्जुन खोतकर यांनी लक्ष्य घातले असून येत्या १५ ते २० दिवसात आपल्या जालना येथे राजूर रोड वरील समृध्दी पुलाच्या खाली असलेल्या श्री फिरोज लाला तांबोळी यांच्या पेट्रोल पंपावर ही सुविधा सुरू होणार असल्याची माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी फोन मार्फत आमच्या प्रतिनिधी कडे दिली. जालना जवळील सिंदखेडराजा येथे ही सुविधा सुरू झाली असून बुलढाणा जिल्ह्यात अजून दोन ठिकाणी सुरू झाली असून चिखली येथे ही सुविधा दोन ठिकाणी सुरू झाले असून या भागातील वाहन धारक यांच्या साठी ही चांगली बाब झाली आहे. जालना जिल्ह्यातील येणाऱ्या काही दिवसात अजून चार ठिकाणी हे सी एन जी सेंटर सुविधा सुरू होणार असल्याची माहिती असून लवकर सुरू करण्याची मागणी या वेळी वाहनधारक यांनी केली आहे.

**आमची बऱ्याच दिवसा पासून ही मागणी होती की जालना येथे सी एन जी सुविधा भेटली पाहिजे. कारण डिझेल आणि पेट्रोल सारखे वाढत आहे आणि गाडी ला अवरेज भेटत नाही. या मुळे खूप चांगले होईल. सी एन जी सुरू होत असल्यामुळे आनंद होत आहे.**

**- अलकेश सोमाणी वाहन धारक**

## स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम : शेख महेमूद

**जालना - प्रतिनिधी**



शिव शाहू फुले आंबेडकर विचारांचे प्रणेते विकासाभिमुख नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंती दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शेख मेहमूद यांनी सांगितले आहे. जालना शहरांमध्ये स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त सेवा सत्ता म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. अरविंदराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जुलै २०२६ ते २६ जुलै २०२६ दरम्यान विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे , याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मराठवाड्याचे नेते आ. विक्रम काळे , अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष *(पान २ वर)*

# अंबड मध्ये धान्याच्या काळ्याबाजारीवर मोठी कारवाई: काळ्या बाजारात विक्रीसाठी साठवलेला ६.३७ लाखांचा

### *शासकीय/शालेय पोषण आहाराचा धान्यसाठा जप्त; एकावर गुन्हा दाखल*

**जालना - प्रतिनिधी**

शासकीय योजने अंतर्गत शालेय पोषण आहारासाठी उपयोगात येणारे गहू व तांदळाचा साठा, काळ्या बाजारात बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने पोलिस व महसूल प्रशासनाने संयुक्त कारवाई करत जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ६ लाख ३७ हजार ४१८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, गोदाम मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे



जिल्हा प्रशासनाने कळविले आहे. याबाबत माहिती अशी की, दि. १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी पुरवठा व महसूल विभागाला गोपनीय माहिती मिळाली की, चांगले नगर, अंबड येथील एका खाजगी पत्र्याच्या गोदामात बेकायदेशीररित्या धान्याचा साठा करून ठेवला आहे. या माहितीच्या आधारे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय पथकाने पोलीस कर्मचाऱ्यांसह रात्री ७.४५ वाजेच्या सुमारास सदर गोदामावर छापा टाकला. गोदामाच्या दरवाजाला कुलूप असल्याने आणि मालक शेख नसीर अब्बास बागवान (रा. अंबड) यांच्याशी संपर्क न होऊ शकल्याने, पंचासमक्ष गोदामाचे कुलूप तोडून आत प्रवेश करण्यात आला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल तपासणी दरम्यान गोदामात कोणताही वैध परवाना किंवा नोंद नसलेला खालील मुद्देमाल मिळून आला यामध्ये गहू १८९ गोण्या (एकूण ९४.५० क्विंटल) किंमत अंदाजे रु. २ लाख ९७ हजार ७०२ तर तांदूळ १५२ गोण्या (एकूण ७६ क्विंटल) किंमत अंदाजे रु. ३ लाख ३३ हजार ७१६ इतर साहित्य मध्ये शासकीय धान्य वितरणासाठी वापरली जाणारी ८० रिकामी *(पान २ वर)*

# विमान वेळेआधी उडवणे टाटा एअरलाइन्सला महागात, ग्राहक आयोगाचा ५० हजारांचा दंड

**चंदीगड - प्रतिनिधी**

चंदीगड राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात टाटा एसआयए एअरलाइन्स लिमिटेडला सेवेतील गंभीर त्रुटीसाठी जबाबदार धरले आहे. प्रवाशांना कोणतीही पूर्वसूचना न देता विमान नियोजित वेळेच्या आधी उडवल्याने झालेल्या त्रासाबद्दल आयोगाने कंपनीला नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. या निकालामुळे सेवा क्षेत्रातील कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसेल आणि ग्राहक हक्कांना अधिक बळकटी मिळेल, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस धन्नावत यांनी दिली आहे. या प्रकरणातील तक्रारदार आयुष बन्सल यांनी टाटा एसआयए एअरलाइन्सकडून चंदीगड ते दिल्ली आणि दिल्ली ते बाली (डेन्पसार) साठी परतीची तिकिटे बुक केली होती. दिनांक ०२.०४.२०२४ रोजी जेव्हा ते डेन्पसार विमानतळावर परतीच्या प्रवासासाठी पोहोचले, तेव्हा त्यांना धक्काच बसला. त्यांचे विमान कोणत्याही सूचनेशिवाय वेळेपूर्वीच निघून गेले होते. यामुळे त्यांना परदेशी विमानतळावर अडकून पडावे लागले आणि भारतात परतण्यासाठी सुमारे ५१,००० रुपये खर्च करून नवीन तिकिटे खरेदी करावी लागली. इतकेच नाही, तर भारतात उशिरा पोहोचल्यामुळे त्यांची दिल्ली ते चंदीगड ही कनेक्टिंग फ्लाईट देखील चुकली.

राज्य ग्राहक आयोगाने (प्रथम अपील क्र. एससी/४/एफए/४२/२०२६) आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, विमानाचे वेळापत्रक बदलल्यास त्याची वेळेवर माहिती *(पान २ वर)*

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांना सावता माळी गौरव पुरस्कार जाहीर

### जालन्यात सावता भवनात माळी समाज बांधवांची बैठक

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रसंत शिरोमणी सावता महाराज यांच्या आगामी पुण्यतिथी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जालन्यात माळी समाज, माळी महासंघ, सावता परिषद आणि वारकरी संप्रदायाची १९ जुलै २०२६ रोजी राजारामनगर येथील सावता भवनात बैठक खेळीमेळीत पार पडली. बैठकीची सुरुवात अत्यंत भावूक वातावरणात झाली. ''राज्यातील बळीराजा सुखावावा यासाठी वरुणराजाने कृपा करावी आणि दमदार पाऊस पडू दे,'' अशी प्रार्थना



सामूहिकपणे करण्यात आली. याच बैठकीत समाजाच्या वतीने मागण्यांचे ठराव मंजूर करण्यात आले, ज्यात राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे. तरुण आणि सुशिक्षित बेरोजगारांना त्वरित नोकऱ्या मिळाव्यात, विविध महामंडळांचे गोरगरिबांचे असलेले कर्ज पूर्णपणे माफ करण्यात यावे.

यंदाचा अत्यंत मानाचा श्री संत शिरोमणी सावता माळी गौरव सन्मान पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री सुमित्राताई पवार, नामदार छगनराव भुजबळ, ना. अतुल सावे, (पर्यटनमंत्री), भास्करराव अंबेकर, सदाशिव वाघमारे आणि शिवनाथ पाऊलबुध्दे या दिग्गज मान्यवरांना प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ रोजी होणारा पुण्यतिथी सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी व्यवस्थापक प्रमुख बाबासाहेब शिवाजी वानखेडे यांनी समितीची घोषणा केली आहे. त्यामध्ये अध्यक्षः अश्विन अंबेकर, कार्याध्यक्षः शिवनाथ पाऊलबुध्दे, नंदु जावळे, उपाध्यक्ष -संतोष जमधडे, वैजिनाथ नागरे, लक्ष्मण इधाटे, राजु इंगळे, रामभाऊ शेषराव पाऊलबुध्दे , रमेश मुळे, प्रभु शिंदे, *(पान २ वर)*

# खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त फळवाटप व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**जालना -प्रतिनिधी**

खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे व सय्यद करीम बिल्डर यांच्या पुढाकाराने गांधी चमन येथील महिला जिल्हा रुग्णालयात फळवाटप आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजेंद्र राख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच रुग्णालय परिसरासह





शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी डॉ. विशाल धानुरे म्हणाले, खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी राजेंद्र राख यांनीही आपल्या मनोगतातून या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सय्यद करीम बिल्डर यांनी विशेष परिश्रम घेतले.

याप्रसंगी राजेंद्र गोरे, उबाळे पाटील, चंद्रकांत रत्नपारखे, दिनेश सुराणा, शेख शकील, कलीम खान, शेख शमशोद्दीन, शेख वसीम, बाबासाहेब सोनोने, वसीम खान, रघुवीर गुडे, जफर मिर्झा, सूरज यंगलटीवार, नेल्सन काबळे, दिग्विजय, शेख जमीर, रहीम बिल्डर, शेख अनीस, सय्यद रज्जाक, आमेर खान, इमरान खान, शेख इरफान, भरत लोढा यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमाला रुग्ण तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# राजवर्धन कळंबे, अश्विनी भागवत या दोघांच्या वडिलांचे निधन, दुःखाचा डोंगर ग्रामीण भागातील विद्यार्थी यांचे नीट मध्ये यश

### दुःखाच्या संघर्षातून समाधाना कडे





**दत्ता देशमुख**

नीट पेपर फुटल्या नंतर पालक वर्गात आणि विद्यार्थी यांच्या कडून मोठा संताप व्यक्त केला गेला. पेपर चांगला गेला आणि पेपर फुटल्या मुळे सगळे रद्द झाल्यानंतर पुन्हा पेपर देऊन चांगले मार्क घेणे खूप अडचणीचे आणि खूप वेदनादायी झाले होते.

मात्र टेंभुर्णी येथील दोन वेवगळ्या विद्यार्थी यांची आपल्या वडिलांच्या निधनानंतर खचून न जाता त्यांच्या स्वप्नाची पूर्ती साठी दुःख सोबत घेऊन मिळविलेले यश हे मोठे असल्याचे दाखवून दिले.

टेंभुर्णी येथील सामाजिक कार्यकर्ता शिक्षक पत्रकार ते सामाजिक आणि राजकीय कामात नेहमी अग्रेसर असलेल्या स्व.विनोद कळंबे यांचे २२ मार्च रोजी अपघाती निधन झाल्यानंतर दुःखातून स्व विनोद कळंबे यांच्या मुलागा राजवर्धन कळंबे यांनी नीट सारख्या अवघड परीक्षा मध्ये ४५६ मार्क घेत चांगले यश प्राप्त केले.वडिलांच्या निधना नंतर परीक्षेला सामोरे जाऊन यश प्राप्त करून वेगळा आदर्श ठेवला आपल्या वडिलाचे निधन झाल्याने नीट सारख्या परीक्षेत मिळालेले यश खूप मोठे असून त्यांच्या यशा बद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

टेंभुर्णी येथील सर्व सामान्य शेतकरी परिवार मधील अश्विनी सांडू भागवत या मुलांनी ४८० मार्क घेत मोठे यश प्राप्त केले. विशेष म्हणजे आपल्या वडिलाचे निधन ज्या दिवशी पेपर होता दिनांक २१ जून रोजी पेपर असल्याने सकाळी वडील यांचे निधन त्याच दिवशी दुपारून पेपर आणि रात्री अंत्य विधी ही गोष्ट मनाला हलवून ठेवणारी होती. या सगळ्या परिस्थितीतून विद्यार्थी जर ४८० मार्क घेतात ही खुप मोठी गोष्ट आहे. विशेष म्हणजे तुला वडील वारले हे सांगितले नव्हते पेपर झाल्यावर ही गोष्ट तिला माहीत झाल्यावर तिच्यावर दुः खाचा जणू डोंगर कोसळला होता.

तिने संपादन केलेले यश हे खूप मोठे असून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अशी प्रगती करतात ही खूप मोठी गोष्ट बाब असून तिच्या वर आलेल्या दुःख सावरून नीट मध्ये प्राप्त केलेल्या यशा बद्दल सर्वत्र या दोन्ही विदार्थी आणि परिवारचे अभिनंदन होत आहे.

# नीट परीक्षेत कु. माधवी बिल्हारे हिचे दैदिप्यमान यश

### भावी डॉक्टर म्हणून समाजसेवेचे ध्येय



**परतूर - प्रतिनिधी**

राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेत ( नीट २०२६) येथील गुणवंत विद्यार्थिनी कु. माधवी उद्धव बिल्हारे हिने आपल्या घवघवीत यशाची परंपरा कायम राखत ५१० गुण प्राप्त केले आहेत. ऑल इंडिया रँकिंगमध्ये ७८००८ वा क्रमांक पटकावून तिने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील प्रवेशाचा मार्ग सुकर केला असून, परिसरात तिचे कौतुक होत आहे. माधवीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, प्रचंड चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. *''मेहनत आजची, यश उद्याचे'' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून तिने अहोरात्र अभ्यास केला. भविष्यात एक आदर्श व कर्तव्यदक्ष डॉक्टर होऊन समाजातील गरीब आणि गरजू रुग्णांची सेवा करण्याचे तिचे उदात्त ध्येय आहे. तिच्या या यशाबद्दल बोलताना माधवीने सांगितले की, ''हे यश माझे एकटीचे नसून माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे कुटुंब, शिक्षक *(पान २ वर)*

# ब्राह्मण सभेत बीजारोपण महोत्सव उत्साहात संपन्न



**जालना - प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ब्राह्मण सभेच्या वतीने रविवारी (दि. १९) सकाळी साडेदहा वाजता ब्राह्मण सभा भवन येथे बीजारोपण महोत्सव उत्साहात संपन्न झाला.

यावेळी वड, पिंपळ, उंबर, लिंब, बहावा, करंज आदी पर्यावरणपूरक वृक्षांच्या बियांचे रोपवाटिकेसाठी बीजारोपण करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाबरोबरच भविष्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीसाठी दर्जेदार रोपे उपलब्ध करून देण्याचा संकल्प ब्राह्मण सभेने केला आहे.

यंदाच्या वर्षापासून दरवर्षी किमान २०० वृक्षांचे बीजारोपण करून त्यांची रोपे तयार करण्यात येणार असून, ही रोपे पुढे शहरातील योग्य ठिकाणी वृक्षलागवडीसाठी नागरिकांना वितरित करण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक नागरिकाने दरवर्षी पावसाळ्यात किमान दहा वृक्षांचे बीजारोपण करून पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे, यासाठी जनजागृती करण्याचा निर्धार ब्राह्मण सभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष रमेश देहेडकर व सचिव आर. आर. जोशी यांनी व्यक्त केला तसेच प्रकल्प प्रमुख रवींद्र देशपांडे व शिवाजी जोशी यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.पर्यावरण संरक्षणासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी करण्याचा संकल्प *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.